तेलंगणातील काँग्रेसचे दोन आमदार टीआरएसमध्ये दाखल

हैदराबाद : लोकसभा निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपल्याने इच्छुक उमेदवारांची पळवापळवी सुरू झाली आहे. तेलंगणात आदिवासी समुदायातील काँग्रेसचे आमदार रेंगा कांथा (पिनपाका) व अत्रम सककू (आसिफाबाद) यांनी तेलंगणा राष्ट्र समिती (टीआरएस) मध्ये प्रवेश केला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री व टीआरएसप्रमुख के. चंद्रशेखर राव यांच्याशी चर्चा झाल्यानंतर या दोन आमदारांनी माध्यमांना माहिती दिली. पक्षप्रवेश करताना आपल्या भागातील आदिवासी नागरिकांना सोईसुविधा व विकासासाठी आपण टीआरएसमध्ये दाखल होत आहे. मात्र, एकीकडे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत टीआरएस पक्षाकडून दोघेही निवडणूक लढणार असल्याचे सांगण्यात येते. तेलंगणात काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत ११९ पैकी फक्त १९ जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यातच दोन आमदारांनी टीआरएसमध्ये पक्षप्रवेश केल्याने आमदारांची संख्या १७ वर आली आहे. तेलंगणा राष्ट्र समितीला ८८ जागा देत नागरिकांनी बहुमत दिले आहे. आता टीआरएसचे संख्याबळ ९०च्या घरात गेले आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव हे स्वबळावर लोकसभा निवडणूक लढविणार आहेत.

लादेनचा मुलगा हमजावर संयुक्त राष्ट्रांचे निर्बंध

न्यूयॉर्क, दि. ३ (वृत्तसंस्था) – संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने 'अल कायदा' दहशतवादी संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन याचा मुलगा हमजा बिन लादेन याला दहशतवादी घोषित करून त्याला निर्बंधांच्या यादीत टाकले आहे. हमजा याचे वास्तव्य सध्या पाकिस्तान–अफगाणिस्तानच्या सीमेजवळ असण्याची शक्यता असून, 'अल- कायदा'चा सध्याचा म्होरक्या एमान अल–जवाहिरी याचा 'संभाव्य उत्तराधिकारी' म्हणूनही उल्लेख करण्यात आला आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या १२६७ आयएसआयएस आणि अल कायदा प्रतिबंध समितीने २९ वर्षीय हमजा बिन लादेन याला काळ्या यादीत टाकले आहे. संयुक्त राष्ट्राने त्याच्याविषयी त्याची ओळख सांगणाऱ्यास अथवा त्याच्या ठिकाणाची माहिती देणाऱ्यास १० लाख डॉलरचे बक्षीस जाहीर केले आहे.

सौदी अरेबियानेही शुक्रवारी हमजा बिन लादेनचे नागरिकत्व रद्द केल्याचे घोषित केले होते. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे याची माहिती दिली आहे. अल–जवाहिरी याने सौदी अरेबियात जन्मलेल्या हमजा बिन लादेन याला 'अल- कायदा'चा अधिकृत सभासद म्हणून जाहीर केले आहे. हमजाने 'अल–कायदा'च्या अनुयायांना दहशतवादी हल्ले घडविण्याचे आवाहन केले होते.

प्रतिबंधात्मक यादीमध्ये आल्याने त्याच्यावर शस्त्रास्त्रे बाळगण्यास आणि प्रवासावर बंदी लागू झाली असून, त्याची मालमत्ताही गोठवली गेली आहे. वडील कुख्यात ओसामा बिन लादेन याला २०११ मध्ये अमेरिकेने मारल्यानंतर संयुक्त राष्ट्रांविरुद्ध दहशतवादी हल्ले करण्याचे संदेश हमजा २०१५ पासून देत आहे. व्हिडीओ आणि ऑडिओ माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या या संदेशातून तो धमक्याही देत असल्याचे संयुक्त राष्ट्राच्या सभासद देशांचे म्हणणे आहे.

प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याची आज सांगता

प्रयागराज, दि. ३ (वृत्तसंस्था)– हिंदुस्थानसह जगातील साधू–संत व महंतांचा वार्षिक उत्सव असलेल्या कुंभमेळ्याची उद्या सांगता होत आहे. १५ जानेवारीला मकरसंक्रांतीच्या पर्वावर शाहीस्नानाने सुरुवात झालेल्या कुंभ शिवरात्रीच्या गंगास्नानाने समारोप होत आहे. या कुंभमेळ्याचे वैशिष्ट्ये म्हणजे हिंदुस्थानात असलेल्या तणावाच्या परिस्थितीतही उत्तर प्रदेश सरकारच्या काटेकोर नियोजनामुळे कुंभमेळा यशस्वी झाला.

या कुंभमेळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप अध्यक्ष अमित शहा, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री, देश–विदेशातील भक्तांनी शाहीस्नानाचा लाभ घेतला. उत्तर प्रदेशातील प्रयागराज संगम येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्यास उद्या सहाव्या व शेवटच्या स्नानपर्वाला शिवरात्र व सोमवार असल्याने पाच कोटी भाविकांची उपस्थिती राहणार आहे. याबाबत आतापर्यंत पंधरा ते वीस कोटी भाविकांनी प्रयागराजच्या पवित्रभूमीत येऊन पुण्य कमावल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

कुंभमेळ्याचे पहिले शाहीस्नान १५ जानेवारी (मकरसंक्रांत पर्व), दुसरे शाहीस्नान ४ फेब्रुवारी (मौनी आमावास्या पर्व), तिसरे शाहीस्नान १० फेब्रुवारी (वसंतपंचमी पर्व) पार पडले. २१ जानेवारी पौष पौर्णिमा पर्व, १९ फेब्रुवारी माघी पौर्णिमा पर्व व उद्या ४ मार्च शिवरात्री पर्वावर तिसरे त्रिवेणी संगमावर गंगास्नान होणार आहे. एकूण ६ वेळा स्नानपर्वाचा योग कुंभमेळ्यात जुळून आला. पवित्रभूमी असलेल्या प्रयागराज येथे गंगा, यमुना, सरस्वती या त्रिवेणी संगमात कुंभमेळ्यामुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. देश–विदेशातील संत – महंत, महिला – पुरुष, युवक, वयोवृद्ध, धार्मिक नेते, अध्यात्मिक गुरू दोन महिन्यांपासून प्रयागराजमध्ये दाखल झाले होते. दरवेळीप्रमाणे प्रशासनाच्या वतीने सर्व भाविकांचे स्वागत करून सुरक्षाव्यवस्था चोख ठेवण्यात आली आहे.

उत्तर प्रदेश योगी सरकारच्या वतीने या कुंभाची जबाबदारी स्वीकारण्यात आली होती. ३२०० हेक्टरवर कुंभाची जागा आरक्षित करून ८ एकरापर्यंत ४१ ठिकाणी स्नानासाठी जागा देण्यात आल्या आहेत. सर्वच ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षारक्षक, पार्किंग व्यवस्था, मोफत बसव्यवस्था आदींमुळे कुंभमेळा आतापर्यंत अगदी सुरळीत पार पडला आहे. किरकोळ आगीच्या घटना व आजारपणामुळे दोघांचे मृत्यू वगळता या कुंभाला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागले नाही.

'जमात–ए–इस्लामी'च्या तीन नेत्यांना अटक; जम्मूत अनेक मालमत्ता जप्त

जम्मू, दि. ३ (वृत्तसंस्था) – नुकतीच बंदी घालण्यात आलेल्या 'जमात–ए–इस्लामी' संघटनेच्या तीन नेत्यांना अटक केली असून, जम्मू प्रदेशातील सहा जिल्ह्यांतील सुमारे बाराहून अधिक मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी आज दिली.

पोलीस दिवसभर जमात–ए इस्लामीचे नेते आणि कार्यकर्ते यांच्या किश्तवार, दोडा, रामबन, पूंछ, राजौरी आणि जम्मू जिल्ह्यातील घरांवर शनिवारी दिवसभर धाडी घातल्या. या धाडीत अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे सापडल्याचे सांगण्यात आले.

बँक खाती गोठविली

जमात–ए–इस्लामीशी संबंधित किमान सहा बँक खाती पोलिसांनी शोधली असून, ती तातडीने गोठविण्याचा आदेश सदर बँकांना देण्यात आला आहे. पोलिसांनी मोहम्मद मजीद शेख, मोहम्मद इक्बाल नाईक आणि गुलाम कादीर भट या तीन नेत्यांना अटक केली आहे, तर गुलाम नबी गुंडाना या आजारी नेत्याला घरातच बंदी करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने गुरुवारी जमात–ए–इस्लामीवर पाच वर्षांसाठी दहशतवादविरोधी कायद्याखाली बंदी घातली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय सुरक्षा बैठकीत जमात –ए–इस्लामीवर बंदी घालण्याचा आदेश देण्यात आला होता. सदर संघटनेतर्फे चालविण्यात येणाऱ्या सर्व शाळांवर शनिवारी धाडी घालण्यात आल्या होत्या. या शाळा अद्यापि बंद केल्या नसून, त्यांच्यावर नजर ठेवण्यात येत आहे. दरम्यान, राज्य काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि माजी मंत्री जी. एम. गफुरी यांनी जमात–ए–इस्लामीवरील कारवाईला आक्षेप घेतला आहे. सदर संघटना दहशतवादी नसून गेली ६० वर्षे राज्यात ३०० हून अधिक शाळा चालवित आहे. त्यामुळे हजारो तरुण शिक्षित होऊन त्यांना रोजगार मिळाला आहे, असा दावा गफुरी यांनी केला आहे.

सीआरपीएफची 'सायकल परेड' गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये

नवी दिल्ली, दि. ३ (वृत्तसंस्था)– केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानांनी रविवारी 'सिंगल लाइन बायसिकल परेड' मध्ये जागतिक विक्रम प्रस्थापित केला. सीआरपीफला ५० वर्षे झाल्यानिमित्त या उपक्रमाचे आयोजन केले होते.

यमुना 'एक्स्प्रेस वे'वर सीआरपीएफचे जवान १,३२७ सायकल्स घेऊन सिंगल लाइन परेडमध्ये सहभागी झाले होते. एकाच रेषेत सातत्याने सायकल चालवित असताना या सर्व सायकलमध्ये समान अंतर ठेवण्यात जवान यशस्वी झाले. सुमारे ३.२ किलोमीटर अंतरात ही सायकल परेड होती. यापूर्वी हिंदुस्थानातील हुब्बळी सायकल क्लबने एकाच रांगेत १,२३५ सायकल चालविण्याचा विक्रम केला होता.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
ई–निविदा सूचना (द्वितीय मुदतवाढ)
भोजन ठेका पुरवठा सन – २०१९–२०
निविदा क्रमांक – ६६२६, ६६२८, ६६३०, ६६३४, ६६३५, ६६४०

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे हे ०६ शासकीय आदिवासी मुला / मुलींच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सन २०१९–२० शैक्षणिक वर्षात भोजन ठेका पुरवठा करण्याकरिता नामांकित / इच्छुक पुरवठाधारक यांच्याकडून ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदा प्रक्रियेसाठी https://maharashtra.etenders.in या संकेतस्थळास भेट देऊन भाग घेता येईल. सदरची ई–निविदा दि. ०१/०३/२०१९ पासून सकाळी १०.०० वाजेपासून ते ११/०३/२०१९ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत या कालावधीमध्ये भरणे आवश्यक आहे.

सही/–
(आर. बी. पंढुरे)
सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे

डी.जी.आय.पी.आर. २०१८/२०१९/७३६०

बारावीच्या परीक्षेदरम्यान, विद्यार्थ्याचा हृदयविकाराने मृत्यू

नवी दिल्ली, दि. ३ (वृत्तसंस्था) – हैदराबाद शहरात बारावीच्या बोर्ड परीक्षेचा पेपर देत असताना एका विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. गोपी राजू (१९) असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, तो चैतन्य महाविद्यालयात शिक्षण घेत होता.

हैदराबाद शहरातील परीक्षा केंद्रावर शनिवारी गोपी राजू बारावीचा पेपर देण्यासाठी परीक्षा केंद्राकडे जात होता. परीक्षेला जात असताना छातीत दुखत असल्याची त्याने तक्रार केली. मात्र, परीक्षेसाठी हजर राहणे महत्त्वाचे असल्याने त्याने परीक्षा केंद्रात जाऊन उत्तरपत्रिका लिहिण्यास सुरुवात केली. मात्र, लिहिता लिहिता तो बाकावरून खाली कोसळला.

परीक्षा केंद्रातील कर्मचाऱ्यांनी त्याला तातडीने नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत विद्यार्थ्याचा मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी सरकारी रुग्णालयात पाठविण्यात आला असून, पोलीस अधिक तपासणी करीत आहेत.

बुलंदशहर हिंसाचारप्रकरणी आरोपपत्र दाखल

बजरंग दल नेता योगेश राजसह ३८ जणांवर दंगलीचा आरोप

मीरत, दि. ३ (वृत्तसंस्था) – उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथे गोहत्येच्या संशयावरून झालेल्या हिंसाचार आणि दंगलप्रकरणी बजरंग दल नेता योगेश राज याच्यासह एकूण ३८ जणांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. यांपैकी ५ जणांवर खुनाचा आरोप ठेवण्यात आला आहे.

बुलंदशहरात ३ डिसेंबर २०१८ रोजी हिंसाचार झाला होता. यात पोलीस निरीक्षक सुबोधकुमार सिंग आणि सुमित कुमार या २० वर्षीय तरुणाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयात पोलिसांनी ३८ जणांवर आरोपपत्र दाखल केल्याची माहिती मीरत विभागाचे अतिरिक्त महासंचालक प्रशांत कुमार यांनी दिली.

५ जणांवर खुनाचा आरोप

योगेश राज यात मुख्य आरोपी असून, शिखर आगरवाल याच्यासह ३८ जणांवर आरोपपत्र ठेवण्यात आले आहे. सियाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिंग्रावती पोलीस चौकीच्या परिसरात ही दंगल झाली होती. या दंगलीनंतर योगेश राज आणि शिखर आगरवाल फरारी झाले होते.

३ जानेवारी रोजी पोलिसांनी योगेश राज याला अटक केली, तर १० जानेवारी रोजी आगरवाल याला हापूर येथून जेरबंद केले होते. या प्रकरणात प्रशांत नट्ट याच्यासह ५ जणांवर खुनाचा आरोप ठेवला आहे. प्रशांत नट्ट याने निरीक्षक सुबोधकुमार सिंग याच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याचे आरोपपत्रात म्हटले आहे. नट्ट याला २७ डिसेंबर रोजी अटक झाली आहे.

भारत–पाकदरम्यान मध्यस्थीची मुस्लिम देशांची ऑफर नाही

परराष्ट्र मंत्रालयाचे स्पष्टीकरण

अबुधाबी, दि. ३ (वृत्तसंस्था) – मुस्लिम देशांच्या संघटनेतील कोणत्याही मुस्लिम देशाने हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या वादात मध्यस्ती करण्यासाठी रसही दाखवलेला नाही की हिंदुस्थानला मध्यस्ती करण्याबाबत ऑफरही दिलेली नाही, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

जगातील ५७ मुस्लिम राष्ट्रांची संघटना असलेल्या ओआयसीची ४६वी सभा संयुक्त अरब अमिरातीमध्ये नुकतीच झाली. या सभेसाठी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांना 'सन्माननीय पाहुण्या' म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. हिंदुस्थानला अशाप्रकारे आमंत्रित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या सभेत हिंदुस्थान अनेक देशांशी द्विपक्षीय चर्चाही करणार आहे. बदलत्या जागतिक आर्थिक परिस्थितीत हिंदुस्थानी बाजारपेठ सर्वच राष्ट्रांना आकर्षित करते आहे.

मात्र, हिंदुस्थानला निमंत्रण दिल्यामुळे जळफळाट झालेल्या पाकिस्तानने सुषमा स्वराज उपस्थित राहणार असतील तर पाकिस्तान सभेवर बहिष्कार टाकेल, अशी धमकीच दिली होती. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री शाह महमूद कुरेशी यांनी पत्राद्वारे ओआयसीचे महासचिव युसेफ बिन अहमद अल–ओथाइमेन यांना ही धमकी दिली होती. मात्र, या धमकीकडे कुणीही लक्ष न दिल्याने त्यांची चांगलीच नाचक्की झाली. परिणामी पाकिस्तानने या सभेवर बहिष्कार टाकला. विशेष म्हणजे पाकिस्तान या मुस्लिम राष्ट्राच्या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. या पार्श्वभूमीवर हिंदुस्थान–पाकिस्तान वादात इस्लामी राष्ट्रे मध्यस्थी करतात काय? असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यावर परराष्ट्र मंत्रालयाने हे स्पष्टीकरण दिले आहे.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे – ४११ ००१
दूरध्वनी क्रमांक : ०२०/२६१२२४५७
Web - www.mahapwd.com & eastpune.ee@mahapwd.com
ई-निविदा सूचना क्रमांक – ९८ सन २०१८–२०१९ (ऑनलाइन) अल्प कालावधी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे – ४११००१ (दूरध्वनी क्रमांक २६१२२४५७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत / अनोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) मागवित आहेत.

ई–निविदा काम क्रमांक	कामाचे नाव	कामाची एकूण अंदाजित किंमत	इसारा/ बयाणा रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	ई–निविदा संचाची किंमत	नोंदणी वर्ग
१	मौजे कान्हुर मेसाई ता. शिरूर, जि. पुणे येथील विकासकामे करणे. (उर्वरित भक्त निवास बांधकाम व संरक्षक भिंतीचे बांधकाम)	१३४.८९ लक्ष	१३५०००/– (ई पेमेंट गेटवेद्वारे)	१२ महिने	१,१२०/– (ई पेमेंट गेटवेद्वारे)	वर्ग – ४ व त्यावरील

ई–निविदेचे निविदा वेळापत्रक

१	ई–निविदा ऑनलाइन विक्री कालावधी	दि. ०४.०३.२०१९ सकाळी १०.०० पासून दि. ११.०३.२०१९ संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत.
२	ई–निविदा ऑनलाइन सादर करण्याचा कालावधी	दि. ०४.०३.२०१९ सकाळी १०.०० पासून दि. ११.०३.२०१९ सायं. १७.३० वाजेपर्यंत
३	निविदा हार्ड कॉपी (Hard Copy) सादर करण्याचा ठिकाण, दिनांक व वेळ	ई–निविदा पोर्टलवर निविदा सादर केल्यानंतर (बीड लॉक) झाल्यानंतर निविदाबाबतची हार्ड कॉपी १ प्रतीत (तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा) सीलबंद लखोट्यामध्ये दिनांक १२.०३.२०१९ सायं. १७.३० वाजेपर्यंत अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ पुणे अथवा कार्यकारी अभियंता, सा. बां. मंडळ (पूर्व) विभाग, पुणे यांचे कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.
४	तांत्रिक व आर्थिक ई–निविदा ऑनलाइन उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ	अधीक्षक अभियंता सा.बां. मंडळ पुणे यांच्या कार्यालयात दिनांक १३.०३.२०१९ रोजी सकाळी ११.३० ते दिनांक १६.०३.२०१९ रोजी सायं. १७.५० पर्यंत (शक्य झाल्यास)

Note :-

1. All eligible / interested contractors are downloading and mandated to get enrolled on e-tendering portal **"http://mahatenders.in"**
2. **For online payment related issues, kindly send email with Bank Reference Number to this email ID merchant@sbi.co.in. You may also contact 022-27560149 for clarifications.**
3. The payment towards the cost of Tender forms will be done online mode only. It should be noted that one should complete these activities at least one day in advance.
4. Contact below for difficulties in online submission of tenders :- (NIC - Toll Free Ph.No. 1800 30702232 / 7878107985-86)
5. Bid submitted through any other mode shall not be entertained. However, Bid Security, proof of online payment of cost of bid document, Power of Attorney and joint bidding agreement etc.
6. Other terms and conditions are detailed in online e-tender form. Right to reject any or all online bid of work, without assigning any reasons there of, is reserved with department.
7. Tender Notice is displayed on P.W.D. website www.mahapwd.com

Sd/-
Executive Engineer,
Public Work (East) Division,
Pune 411 001.

डी.जी.आय.पी.आर. २०१८/२०१९/७३६८

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी – ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई, महाराष्ट्र, पिनकोड – ४०० ०५१.
शाखा कार्यालय : झोन २ ज्ञाती युनिट्री, ४ था मजला, येरवडा, पुणे–नगर महामार्ग, पुणे – ४११ ००६.

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींअंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना

खालील तक्त्यामध्ये दिलेल्या तपशिलानुसार आम जनतेस व विशेषतः कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनको अर्थात कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकडे गहाण/प्रभारित खालील विवरणीत स्थावर मालमत्तांची ज्यांचा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला होती त्या मालमत्तेची आमच्या सूचनेत मागणी केल्यानुसार थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर खालील तक्त्यामध्ये नमूद तारखेस विक्री करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार व हमीदारांचे नाव व पत्ता	ताबा दिनांक	ज्ञात भार, काही असल्यास, त्यांसमवेत स्थावर मालमत्तेचे विवरण	१. ई–लिलावाची तारीख व वेळ, २. इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख, ३. मालमत्तेच्या पडताळणीची तारीख व वेळ	१. राखीव मूल्य, २. मालमत्तेचे इरठे
१.	**श्री. बलबीर सिंह नरेंद्र सिंह ठाकूर, श्री. नरेंद्र सिंह ठाकूर यांचे पुत्र व श्रीम. संगीता बलबीर सिंह ठाकूर, श्री. बलबीरसिंह नरेंद्र सिंह यांची पत्नी. दोन्ही राहणार :** फ्लॅट क्र. ४०२, ४ था मजला, सीटीएस क्र. ४३२/बी, अमित प्रेरणा, पत्र्या मारूती चौकजवळ, नीलकंठ ज्वेलर्सच्यावर, नारायण पेठ, पुणे – ४११ ०३०. **श्री. बलबीरसिंह नरेंद्र सिंह ठाकूर, तसेच :** फ्लॅट क्र. ०७, २ रा मजला, सीटीएस क्र. ३२३, लक्ष्मी पुजा निवास, अल्पना टॉकीजच्यासमोर, गणेश पेठ, पुणे – ४११०११. **कर्ज खाते क्र. :** १५८४५९४५ व १५८७७३७० **एकूण थकबाकी :** दि. २७.०२.२०१९ रोजीनुसार रक्कम रु. ९८,१०,९७४/– (रु. अठ्ठ्याण्णव लाख दहा हजार नऊशे चौऱ्याहत्तर मात्र) अधिक दि. २८.०२.२०१९ पासून संपूर्ण प्रदानापर्यंत द.सा. १४% दराने पुढील व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्चासमवेत.	२२.०१.२०१९ प्रत्यक्ष ताबा	पुणे महापालिका मंडळ व सीटीएस क्र. ४३२–बी, नारायण पेठ, पुणे मोजमापित क्षेत्र ७६५.८९ चौ. मीटर च्या मर्यादेतील नेंदणीकरण उपजिल्हा तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील ४ थ्या मजल्यावरील संलग्न टेरेस मोजमापित ८.५५ चौ. मीटरसह समान पॅसेज, शिड्या, लँडिंग, लिफ्ट आदी (३% पेक्षा जास्त नसलेले) असलेल्या योग्य भागाच्या फ्लॅट क्र. ४०२, ४ था मजला, मोजमापित बिल्टअप क्षेत्र अंदाजे ८२.४० चौ. मीटर (अर्थात चटई क्षेत्र ६४.०१ चौ. मीटर) धारक सर्व तो भाग व भूखंड.	१. ई–लिलाव दिनांक : २०.०३.२०१९ रोजी दु. १.०० ते दु. २.००, ५ मिनिटांच्या स्वयंविस्तारासह. २. केवायसीसमवेत इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख : दि. १८.०३.२०१९ रोजी सायं. ५.०० (भा. प्र. वे.) पर्यंत. ३. परीक्षण दिनांक : ०७.०३.२०१९ रोजी स. ११.०० ते दु. ४.०० (भा. प्र. वे.)	**राखीव मूल्य :** रु. ७९,००,०००/– (रु. एकोणऐंशी लाख मात्र) **इसारा रक्कम ठेव :** रु. ७,९०,०००/– (रु. सात लाख नव्वद हजार मात्र) **बोली विस्तार :** रु. १,००,०००/– (रु. एक लाख मात्र) व त्या पटीतून.
२.	**श्री. अंबरिश बाळकृष्ण दरक, व श्रीमती अपर्णा अंबरिश दरक दोघांचाही पत्ता** सर्व्हे क्र. १४ ग्लिटेरा, आयटी बिल्डिंग, पिंपळे निलख, पुणे ४११०२८. **मे. इम्पेरिकल मेडी सोल्युशन प्रा. लि.** पत्ता १ ला मजला, नरसिंह सेंटर व्हिजन, आपले रोडच्या पुढे, पुणे – ४११ ००४ **कर्ज खाते क्र.** ४०२एएपी२०१६३३५९ व ४०२०डीएल०१३५०३८ **एकूण थकबाकी :** दि. २५.०१.२०१७ रोजीनुसार रु. १,३५,२१,३८४/– (रु. एक कोटी पस्तीस लाख एकवीस हजार तीनशे चौऱ्याऐंशी मात्र) अधिक संपूर्ण प्रदानापर्यंतचा सर्व खर्च, मूल्य व व्यय आदींसमवेत.	२८.०९.२०१७ प्रत्यक्ष ताबा	पुढील विवरणाच्या बिगरशेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड कार्यालय क्रमांक १८ ते २५ एकूण ५ वा मजला, इमारत क्रमांक ए, हायवे टॉवर्स सर्व्हे क्र. १५४/४, सीटीएस क्र. ५१२८ (पार्ट), आकुर्डी ४११० ०३५	१. ई–लिलाव दिनांक : २७.०३.२०१९ रोजी दु. १२.०० ते दु. १.००, ५ मिनिटांच्या स्वयंविस्तारासह. २. केवायसीसमवेत इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख : दि. २६.०३.२०१९ रोजी सायं. ५.०० (भा. प्र. वे.) पर्यंत. ३. परीक्षण दिनांक : ०६.०३.२०१९ रोजी स. ११.०० ते दु. ४.०० (भा. प्र. वे.)	**राखीव मूल्य :** रु. ६९,००,०००/– (रु. एकोणसत्तर लाख मात्र) **इसारा रक्कम ठेव :** रु. ६,९०,०००/– (रु. सहा लाख नव्वद हजार मात्र) **बोली विस्तार :** रु. १,००,०००/– (रु. एक लाख मात्र) व त्या पटीतून.
३.	**श्रीमती किशोरी नारायण शेट्टी – श्री नारायण शेट्टी यांच्या पत्नी व श्री. मानव नारायण शेट्टी – श्री. नारायण शेट्टी यांचे पुत्र. दोघांचाही पत्ता : रो हाऊस क्र. ४, मानवस्थळ – १, गोकुळधाम, गोरेगाव (पू.), मुंबई – ४०० ०६३. दोघांचाही अन्य पत्ता :** वेदान्त प्युअर व्हेज, दुकान क्र. ४ व ५, लँडमार्क सेंटर, पुणे–सातारा मार्ग, पुणे., रो हाऊस क्र. ४, मानवस्थळ – १, गोकुळधाम, गोरेगाव (पू.), मुंबई – ४०० ०६३. **कर्ज खाते क्र. :** ११७४५९६ **एकूण थकबाकी :** दि. ०१.०३.२०१९ रोजीनुसार रु. ९५,८३,२२०.७४ (रु. पंच्याण्णव लाख त्र्याऐंशी हजार दोनशे वीस व चौऱ्याहत्तर पैसे मात्र) अधिक दि. ०२.०३.२०१९ पासून संपूर्ण प्रदानापर्यंत द.सा. १३.६५% दराने पुढील व्याज तसेच सर्व मूल्य, प्रभार व खर्च यांसमवेत.	०५.०३.२०१८ प्रत्यक्ष ताबा	पुणे महानगरपालिका हद्दीतील, उप नोंदणीकरण जिल्हा तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील गाव कोंढवा खुर्द येथील सर्व्हे क्र. २०, हिस्सा क्र. २ धारक मोजमापित १० एकर अर्थात ४०००० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीच्या भाग व भूखंडावर निर्मित सन सिटी बी बिल्डिंग को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीतील इमारत क्र. बी मधील ७ व्या मजल्यावरील मोजमापित साधारण २०१५ चौ. फूट अर्थात १८७.२६ चौ. मी. बिल्टअप क्षेत्रफळाच्या फ्लॅट क्र. ७०२ (जुना फ्लॅट क्र. ५३) धारक मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड, मोजमापित साधारण २०१५ चौ. फूट अर्थात १८७.२६ चौ. मी. क्षेत्रफळाच्या टॉप टेरेससमवेत.	१. ई–लिलाव दिनांक : २७.०३.२०१९ रोजी दु. १.०० ते दु. २.००, ५ मिनिटांच्या स्वयंविस्तारासह. २. केवायसीसमवेत इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख : दि. २६.०३.२०१९ रोजी सायं. ५.०० (भा. प्र. वे.) पर्यंत. ३. परीक्षण दिनांक : ०६.०३.२०१९ रोजी स. ११.०० ते दु. ४.०० (भा. प्र. वे.)	**राखीव मूल्य :** रु. ७९,००,०००/– (रु. एकोणऐंशी लाख मात्र) **इसारा रक्कम ठेव :** रु. ७,९०,०००/– (रु. सात लाख नव्वद हजार मात्र) **बोली विस्तार :** रु. १,००,०००/– (रु. एक लाख मात्र) व त्या पटीतून.

इसारा रक्कम कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या नावे पुणे येथे देय स्वरूपात डीडी स्वरूपात किंवा **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड खाते क्र. ०६४१०१५७०२००२१** येथे एनईएफटी/आरटीजीएसद्वारे जमा करावी व आयएफएससी कोड : केकेबीके००००९५८, शाखा नरिमन पॉइंट, मुंबई, शाखेचा सांकेतांक : ०६४१.

विक्री करावयाच्या संपत्तीसंदर्भातील कोणतेही स्पष्टिकरण/आवश्यकतेसंदर्भात कृपया संपर्क साधा : **श्री. निखिल देशमुख (+९१ ९६०७९११९१०१ व ०२०–६७४४३३६८) व श्री. पंकज राय (+९१ ७७६८००३५६७ व ०२०–६७४४३१०७).**

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया वेबसाइट
कोटक बँक वेबसाइट www.kotak.com व/वा https://kotakbank.auctiontiger.net लिंक HTTPS://WWW.KOTAK.COM/EN/BANK-AUCTIONS.HTML पाहा.

ठिकाण : पुणे
दिनांक : ०४.०३.२०१९

प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकरिता